# जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरती सन २०२३
## जाहीर प्रसिध्दीपत्रक

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/२०५/ सन २०२४** दि.:०७.०६.२०२४

१. जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरतीसाठी विविध १४ संवर्गांच्या परिक्षा घेणेत आलेल्या आहेत. सदर पदांसाठीची ऑनलाईन परीक्षा दिनांक २७.१२.२०२३, दिनांक २९.१२.२०२३, दिनांक ३१.१२.२०२३, दिनांक ०१.०१.२०२४ व दिनांक ०२.०१.२०२४ रोजी संपन्न झालेली आहे.

२. उमेदवारांची Markwise Merit List शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०३.०३.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३. सर्व संवर्गांच्या (निम्न श्रेणी लघुलेखक पदाच्या वगळून) कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांची (List of Candidates for Document Verification) यादी शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. शासन पत्र क्र. संकीर्ण-११२४/प्र.क्र.१२६/आस्था (अतांत्रिक), दि. ०७/०६/२०२४ नुसार ठाणे परिमंडळ व नाशिक परिमंडळ वगळुन कागदपत्रे पडताळणी यादी प्रसिध्द करणेत येत आहे.

४. सदर यादीमधील नमूद उमेदवारांना गुणवत्ता व नमूद आरक्षणानुसार प्राथमिक स्तरावर पात्र/अपात्रता अमजावणेसाठी केवळ कागदपत्रे तपासणीसाठी बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी/तपासणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार उपलब्ध पदांनुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिम १२२२/ प्र.क्र. ५४/का १३ अ दि. ०४.०५.२०२२ नुसार अंतीम निवडसूची तयार करणेत येईल. कागपदत्र पडताळणी यादीमध्ये उमेदवारांचे नाव समाविष्ठ झाले असले म्हणजे अंतिम निवडसुची/प्रतिक्षायादी मध्ये समाविष्ठ झाला असे नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक यांची कागदपत्र पडताळणी यादी मा. महाराष्ट्र प्राशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या याचिका क्र. ४८३/२०२४ तसेच सहाय्यक आरेखक यांची कागदपत्र पडताळणी यादी मा. उच्च न्यायालय, मुंबई रिट पिटीशन (एस. टी) नं. ९८२१/२०२४ यांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात प्रसिध्द करणेत येत आहे.

६. उमेदवाराने ज्या परिमंडळासाठी अर्ज केलेला आहे, त्या परिमंडळाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कागदपत्र पडताळणीसाठी नमुद केलेल्या पत्त्यावर कागदपत्र पडताळणी होणार आहे तरी आपला कागदपत्र पडताळणी अनुक्रमांक (Sr No.) व आपणास कागदपत्र पडताळणीसाठीचे ठिकाण पाहून नमूद तारखेस व नमूद ठिकाणी उपस्थित राहण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

७. सदर उमेदवारांनी त्यांचे पदानुसार www.wrd.maharashtra.gov.in या वेबससाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली तपासणी सूची भरुन त्यांचे संबंधित मूळ कागदपत्रे व मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित २ प्रतीसह उपस्थित रहावयाचे आहे.

८. सदर पडताळणीस गैरहजर राहिलेल्या अथवा कागदपत्रांची पूर्तता न केलेल्या उमेदवारांस कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, तसेच भविष्यात याबाबत उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

९. ज्या उमेदवारांने एका संवर्गापेक्षा अधिक संवर्गासाठी वेगवेगळया परिमंडळात अर्ज कलेला आहे व एकापेक्षा अधिक पदांच्या 'कागदपत्र पडताळणी यादी' मध्ये उमेदवाराचा समावेश असेल व कागदपत्र पडताळणीची दि. व वेळ एकच असल्यास अशा परिस्थितीत उमेदवाराने संबंधित परिमंडळांना E mail व्दारे दि. ११.०६.२०२४ पर्यंत कळवावे. पडताळणीसाठी नवीन दिनांक व वेळ उपलब्ध करून घेण्यात यावा.

१०. अत्यंत अपरिहार्य कारणास्तव एखाद्या उमेदवारास उपस्थित रहाता आले नाही व तसे उमेदवाराने E mail व्दारे दि. ११.०६.२०२४ पर्यंत पूर्वसूचना दिल्यास त्याबाबतची सत्यता समन्वय समिती पडताळून पाहील व त्या उमेदवाराबाबत निर्णय घेण्यात येईल. याबाबतची पुर्वसुचना त्या त्या परिमंडळाच्या नमुद ई-मेलवर पाठविण्यात यावी.

११. जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरतीबाबत यापुढील इतर आवश्यक सूचना https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून वरील संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता चं बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी
दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, ठाणे

# कागदपत्र तपासणी वेळापत्रक

| अ.क्र | परीमंडळ कार्यालयाचे नाव व संपुर्ण पत्ता | दिनांक | संवर्गाचे नाव | सकाळ सत्र (सकाळी १०:३०) | दुपार सत्र (दुपारी ०२:००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, संभाजीनगर परिमंडळ, पाटबंधारे विभाग, संभाजीनगर<br>**ई-मेल :-** **sechsmbhajinagarzonewrd@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०२४० - २९५००४७**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** विश्वेश्वरय्या सभागृह, सिंचन भवन, कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | दि.१८/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अनु.क्र १ ते २०० | अनु.क्र २०१ ते ४०० |
| | | दि.१९/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अनु.क्र ४०१ ते ७०० | अनु.क्र ७०१ ते ७८९ |
| | | | सहाय्यक भांडारपाल | -- | अनु.क्र १ ते ११० |
| | | दि.२०/०६/२०२४ | दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अनु.क्र १ ते ३०० | अनु.क्र ३०१ ते ५०० |
| | | दि.२१/०६/२०२४ | दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अनु.क्र ५०१ ते ८०० | अनु.क्र ८०१ ते १००० |
| | | दि.२२/०६/२०२४ | दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अनु.क्र १००१ ते ११७६ | -- |
| | | | सहाय्यक आरेखक | अनु.क्र १ ते ४३ | -- |
| | | | आरेखक | अनु.क्र १ ते १५ | -- |
| | | | अनुरेखक | -- | अनु.क्र १ ते १७५ |
| २ | अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय व परीमंडळीय अधिकारी, पुणे परीमंडळ, पुणे<br>**ई-मेल :-** **sepunezone@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०२० - २६३६०९९१**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** विश्वेश्वरैय्या सभागृह, सिंचन भवन, मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे-४११०११ | दि.१८/०६/२०२४ | वरीष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | अ.क्र १ ते ६ | -- |
| | | | वरीष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | अ.क्र १ ते ४२ | -- |
| | | | आरेखक | अ.क्र १ ते १६ | -- |
| | | | सहाय्यक आरेखक | अ.क्र १ ते ३४ | -- |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र १ ते १५२ | अ.क्र १५३ ते ४०२ |
| | | दि.१९/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र ४०३ ते ५४६ | -- |
| | | | प्रयोगशाळा सहाय्यक | अ.क्र १ ते ६ | -- |
| | | | अनुरेखक | अ.क्र १ ते १०० | अ.क्र १०१ ते १३८ |
| | | | सहाय्यक भांडारपाल | -- | अ.क्र १ ते ५५ |
| | | | कनिष्ठ सर्वेक्षण सहाय्यक | -- | अ.क्र १ ते २३ |
| | | | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | -- | अ.क्र १ ते १३४ |
| | | दि.२०/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १३५ ते ३८५ | अ.क्र ३८६ ते ६३५ |
| | | दि.२१/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र ६३६ ते ८८५ | अ.क्र ८८६ ते ११३५ |
| | | दि.२२/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र ११३६ ते १३८५ | अ.क्र १३८६ ते १५०६ |
| ३ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती<br>**ई-मेल :-** **seviguamt@rediffmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:-** ०७२१-२९५०८०२<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** मनोरंजन हॉल, उर्ध्व वर्धा वसाहत, शिवाजी नगर, अमरावती - ४४४६०३ | दि.१८/०६/२०२४ | सहाय्यक आरेखक | अ.क्र १ ते १२ | अ.क्र १३ ते २५ |
| | | | सहाय्यक भांडारपाल | अ.क्र १ ते १२ | अ.क्र १३ ते २९ |
| | | | आरेखक | अ.क्र १ ते ९ | -- |
| | | | अनुरेखक | अ.क्र १ ते ६ | अ.क्र ३७ ते ५३ |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र १ ते १२ | अ.क्र १३ ते ६४ |
| | | दि.१९/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र ६४ ते १४८ | अ.क्र १४९ ते २४० |
| | | दि.२०/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १ ते ८४ | अ.क्र ८५ ते १७५ |
| | | दि.२१/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १७६ ते २४७ | अ.क्र २४८ ते ३१९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ व परीमंडळीय अधिकारी, सातारा कोल्हापूर परिमंडळ, सातारा<br>**ई-मेल :- kopzonesatara@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०२१६२ - २४६०७१**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** करमुणक केंद्र, गेट क्र. ३, कृष्णानगर वसाहत, कृष्णानगर, सातारा-४१५००३ | दि.१८/०६/२०२४ | आरेखक | अ.क्र. १ ते १७ | -- |
| | | | सहाय्यक आरेखक | अ.क्र. १ ते २३ | -- |
| | | | सहाय्यक भांडारपाल | अ.क्र. १ ते ६९ | -- |
| | | | अनुरेखक | अ.क्र. १ ते ४० | अ.क्र. ४१ ते ९४ |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | अ.क्र. १ ते ४० |
| | | दि.१९/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र. ४१ ते १९० | अ.क्र. १९१ ते ३२० |
| | | दि.२०/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक<br>दप्तर कारकून / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अ.क्र. ३२१ ते ४७०<br>-- | अ.क्र. ४७१ ते ५१७<br>अ.क्र. १ ते ९३ |
| | | दि.२१/०६/२०२४ | दप्तर कारकून / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अ.क्र. ९४ ते २४५ | अ.क्र. २४६ ते ३७५ |
| | | दि.२२/०६/२०२४ | दप्तर कारकून / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अ.क्र. ३७६ ते ५२५ | अ.क्र. ५२६ ते ६४७ |
| ५ | अधीक्षक अभियंता तथा परीमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, पाटबंधारे विभाग, नागपुर परीमंडळ, नागपुर<br>**ई-मेल :- superofvig@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०७१२ - २५३०८९९**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प पुनवर्सन पथक, नागपुर यांचे कार्यालय प्लॉट नं. १३ (ऑफिसर्स क्लब जवळ वॉकर्स स्ट्रीट जवळ) सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१ | दि.१८/०६/२०२४ | सहाय्यक भांडारपाल | अ.क्र १ ते ३० | अ.क्र ३१ ते ६७ |
| | | | आरेखक | अ.क्र १ ते ९ | -- |
| | | | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १ ते ८० | अ.क्र ८१ ते १६० |
| | | दि.१९/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १६१ ते २४० | अ.क्र २४१ ते ३२० |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र १ ते ४० | अ.क्र ४१ ते ८० |
| | | दि.२०/०६/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.क्र ८१ ते १६७ | अ.क्र १६८ ते २५३ |
| | | | अनुरेखक | अ.क्र १ ते ३९ | अ.क्र ४० ते ७८ |
| | | दि.२१/०६/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र ३२१ ते ४२५ | अ.क्र ४२६ ते ५३२ |

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता चं बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी
दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, ठाणे